क्र. कामगार विभाग/ब/क. क. नि. स/२३६९१
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
प्रकाशगड, बांद्रा [पूर्व] मुंबई-५१
दिनांक :- ३-७-९०

## प रि प त्र क

विषय :- कर्मचारी कल्याण निधी- मंडळाच्या अधिकारी व कर्मचा-यांच्या पाल्यांना रोख पारितोषिके व शिष्यवृत्ती देण्याबाबत.

१] कर्मचारी कल्याण निधीतून १९९० च्या मार्च/एप्रिल मध्ये झालेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या मंडळातील कर्मचा-यांच्या पाल्यांना विशेष पारितोषिक, रोख पारितोषिक, व शिष्यवृत्त्या देण्याकरिता, तसेच दिलेल्या शिष्यवृत्त्या पुढे चालू ठेवणेकरिता अर्ज मागविण्यांत येत आहे. सर्व क्षेत्रीय अधिका-यांना ह्या पत्राद्वारे विनंती करण्यांत येते की, त्यांनी ह्या योजनेबद्दल कर्मचा-यांमध्ये भरपूर प्रमाणांत प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी व अनुक्रमे अ, ब, क, आणि ड ह्या सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्ये कर्मचा-यांनी पाठविलेले अर्ज ह्या कार्यालयात दिनांक ३१-८-९० प. पोहोचतील अशारितीने पाठवावेत.

२] त्याचप्रमाणे उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या ९०-९१ करिता चालु ठेवावयाच्या असल्यास योग्य ती प्रमाणपत्रे, गुणांची यादी, आणि उच्च शिक्षण घेत असल्याचा कागदोपत्री पुरावा इत्यादिंच्या आवश्यक प्रतीसह [प्रमाणित करुन] अर्ज ३१-८-९० पर्यंत त्या त्या परिमंडळ कार्यालयात मिळतील अशारितीने सादर करण्यांत यावेत. तसेच शिष्यवृत्त्या चालु ठेवण्याचे अधिकार त्या त्या परिमंडळाच्या मुख्य अभियंत्यांना देण्यांत आलेले आहेत याची नोंद घ्यावी.

३] अर्ज उशीरा मिळाल्यामुळे उद्‌भवणा-या समस्या टाळण्याकरिता आपल्या अर्जाची एक आगाऊ प्रत : मुख्य कार्यालयात पाठविण्यास सर्व कर्मचा-यांना कळवावे सर्व अर्ज मुख्य कार्यालय, मुंबई येथें नियोजित वेळेपूर्वी पाठविण्याची जबाबदारी संबंधित अधिका-यावर राहील.

४] तसेच असे निदर्शनांस आले आहे की, बरेचसे कर्मचारी रोख पारितोषिक, शिष्यवृत्त्यांसाठी योग्य, त्या विहित नमुन्यामध्ये अर्ज भरुन पाठवित नाहीत आणि संबंधित कार्यालयातून त्याचे अर्ज मुख्य कार्यालयास पाठविण्यापूर्वी नीट तपासले जात नाहीत व त्यामुळे. क्षेत्र अधिका-यांशी पत्र व्यवहार करावा लागत असल्यामुळे क. क. निधी समितीच्या बैठकीपुढे बक्षिसे/शिष्यवृत्त्या देण्याबाबतची माहिती सादर करण्यांस विलंब

होते. अर्जाची योग्य तपासणी करुन ये अर्ज योग्य त्या प्रपत्रात भरले असतील तेच अर्ज मुख्य कार्यालयात पाठवावे. मुख्य कार्यालयात सर्व अर्ज ३१-८-९० पर्यंत मिळावेत. त्यानंतर मिळालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

५] तसेच असेहि आढळून आले आहे की, चतुर्थ श्रेणी कर्मचारी व मागासवर्गीय कर्मचारी ह्यांना कर्मचारी कल्याणनिधीतून अशा तऱ्हेची पारितोषिके, शिष्यवृत्त्या त्यांच्या पाल्यांना दिल्या जातात त्याबाबतची पाहिजे तेवढी माहिती नसल्यामुळे त्यांच्याकडून या योजनेला योग्य तो प्रतिसाद मिळत नाही. वास्तविक पहाता, ह्या मुद्यावर या कार्यालयाचे परिपत्रक क्र-कामगार/व/क.क.नि.स/२३२३३ दि. १३-७-८९ नुसार योग्य प्रतिसादासाठी सर्व क्षेत्रीय अधिका-यांना याआधीही विनंती करण्यात आलेली आहे की, जास्तीत जास्त कर्मचा-यांनी लाभ घेण्यासाठी या योजनेचा विस्तृत प्रमाणावर प्रचार करावा. तेव्हा सर्व क्षेत्रिय अधिका-यांचे लक्ष पुन्हा एकदा वरिल परिपत्राकडे वेधण्यात येते व विनंती की, त्यांनी ह्या कल्याणकारी योजनेचा लाभ अधिकाधिक कर्मचा-यांच्या पाल्यांना घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.

६] प्रपत्र ड सादर करतांना मंडळाच्या माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत गुणवत्ता यादीत पहिल्या ५० क्रमांकापर्यंत आलेले विद्यार्थी/विद्यार्थिनिंना विशेष पारितोषिक रु.५००/- दिले जाते. परंतु याबाबत नमूद करण्यात येते की बरेचसे विद्यार्थी/विद्यार्थिनी गुणवत्ता यादीत पहिल्या ५० त आल्याचा अनुक्रमांकाचे प्रमाणपत्र, [प्रमाणित] जोडीत नाहीत तरी याबाबतही योग्य ती काळजी घेऊन पहिल्या ५० क्रमांकात उत्तीर्ण झाल्याचे [प्रमाणित] प्रमाणपत्र सर्व ड प्रपत्रासह पाठवावेत.

७] सर्व क्षेत्रीय अधिका-यांना विनंती करण्यांत येते की, अर्ज पाठवताना कर्मचा-याचा वेतनगट व जातीचा दाखला [प्रमाणित] ह्याविषयी अर्जाच्या वरती लालशाईने लिहून पाठवावे. अर्ज पाठवतांना वेतनगटवारी करुनच पाठवावे. कृपया परिपत्रकास जास्तीत जास्त प्रसिध्दी द्यावी.

सदरहू परिपत्राची कृपया पोचपावती द्यावी.

सोबत प्रपत्र अ, ब, क, ड

सचिव
म. रा. वि. मंडळ कर्मचारी कल्याण निधी समिती व
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रति–
प्रेषण यादीप्रमाणे.

## प्र प त्र "अ"

मुख्य कार्यालयीन परिपत्रक क्र. एलआयआर/ब/२२/५८१०४ ता. ३०-१२-१९७६ नं. एलआयआर/ब/३४६३८, ता. २-८-१९७८ आणि नं. एलआयआर/ब/५२४३/१४९८ ता. १२-१-१९८३ प्रमाणे रोख बक्षिसे योजने करिता रु. २००/- रु. १५०/- रु. १२५/- रु. १००/- रु. ७५/- व रु. ५०/- मिळण्याकरिता करावयाचा अर्ज.

१) अर्जदाराचे नांव :

२) वडील/आईचे नांव व हुद्दा :

३) वडील/आईचे काम करण्याचे ठिकाण :

संभाग :

प्रविभाग :

परिमंडळ :

४) वेतनगट :

५) अनुसूचित जात/जमात/भटकी जमात इतर मागासवर्गीय जातीत मोडत आहात काय ? (असल्यास, तत्संबंधीचा दाखला सोबत जोडावा.) :

६) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम परिक्षा पास झाल्याची तारीख :

७) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम परिक्षेला बसलेल्या केंद्राचे व शाळेचे नांव :

केंद्र :

शाळा :

८) एकंदर गुण व गुणांची टक्केवारी :
(प्रथम किंवा दुसरा वर्ग इ.) :

सोबत : गुणपत्र/जातीचा दाखला
साक्षांकित केलेल्या प्रतीसह
विद्यार्थ्याचे आई/वडिल/
काम करीत असलेल्या युनिटच्या
प्रभारी अधिकाऱ्याने
साक्षांकित करावे

...२...

मी, श्री/श्रीमती ---------------------------------------------------------------

हुद्दा -------------------------------- वडील/आई, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,

----------------------------------------येथे काम करीत असलेला/ली/असे नमूद

करितो/ते की, वरील दिलेली माहिती सत्य आहे.

कर्मचा-याची सही

सादर अग्रेषित :-

असे प्रमाणित करण्यात येते की, माझ्या माहितीनुसार वर दिलेली माहिती, पडताळून पाहण्यात आली असून ती बरोबर आहे.

नियंत्रण अधिका-याची सही

"प्र प त्र" ब "

मुख्य कार्यालयीन परिपत्रक क्र. एलआयआर/ब/८२-८३/१४९८ दि. १२-१-८३ नं. ५८१०२, दि. ३०-१२-७६ आणि परिपत्रक क्र. ६११३, दि. ११-२-८१ नुसार शिष्यवृत्ती मिळणेसाठी करावयाचा अर्ज

१. अर्जदाराचे नांव :

२. अर्जदाराच्या आई/वडीलाचे नांव व हुद्दा :

३. अर्जदाराच्या आई/वडीलांचे कामाचे

ठिकाण :

संभाग :

प्रविभाग :

परिमंडळ :

४. वेतन गट :

५. अनुसूचित जात/जमात/भटकी जमात/ इतर मागासवर्गीय जातीत मोडत आहात काय ? :

[असल्यास, तत्संबंधीचा दाखला सोबत जोडावा] :

६. अ] माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम परीक्षा पास झाल्याची तारीख व वर्ग

ब] एकंदर मिळविलेले गुण [मार्क] व त्यांची टक्केवारी :

७. पुढील शिक्षण/उच्च शिक्षण चालू ठेवण्यासाठी ज्या शाळेत कॉलेजात प्रवेश घेतलास त्याचे नाव [प्रवेश घेतल्याचा दाखला सोबत जोडणे] :

सोबत : अ] पास झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका व दाखला साक्षांकित केलेले :

ब] ज्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतला त्या विषयीचा दाखला

अर्जदाराची सही

..२..

मी, श्री. /श्रीमती------------------------------------------------------------------

हुद्दा ---------------------------------- वडील/आई, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

---------------------------- येथे काम करीत असलेला/ली असे नमूद करितो/ते

की, वरील दिलेली माहिती सत्य आहे.

कर्मचा-याची सही

सादर अग्रेषित :

असे प्रमाणित करण्यांत येते की, माझ्या माहितीनुसार वर दिलेली माहिती पडताळून पाहण्यात आली असून ती बरोबर आहे.

नियंत्रण अधिका-याची सही.

प्र प त्र "क"

मुख्य कार्यालयीन परिपत्रक क्र. [illegible]यआर/ब/८२-८३/१४९८ दिनांक १२-१-१९८३ व नं. ५८१०९ ता. ३०-१२-७६ नुसार रु. ६०/- महिन्याप्रमाणे शिष्यवृत्ती चालू ठेवण्यासाठी करावयाचा अर्ज.

१] अर्जदाराचे नांव :

२] अर्जदाराच्या आई/वडीलांचे नांव व हुद्दा :

३] अर्जदाराच्या आई/वडीलांच्या कामाचे ठिकाण :

संभाग :

प्रविभाग :

परिमंडळ :

४] मागील वर्षी शिष्यवृत्ती मिळाली आहे काय ? असल्यास परिपत्रक क्र. व तारीख नमूद करावी. :

५] वेतन गट :

६] अनुसूचित जात/जमात/भटकी जमात/इतर मागासवर्गीय जातीत मोडत आहात काय ? असल्यास तत्संबंधी दाखला सोबत जोडावा :

७] अ] मागील परीक्षा पास झाल्याची तारीख व गुण [गुणपत्रिकेची प्रत जोडावी] :

ब] एकंदर मिळविलेले गुण व त्याची टक्केवारी :

क] आता कोणत्या वर्गात शिकत आहात :

८] पुढील शिक्षण चालू असलेल्या ज्या कॉलेजात प्रवेश घेतला त्याचे नांव [प्रवेश घेतल्याचा दाखला सोबत जोडावा] :

सोबत :- १] मागील परीक्षापास झाल्याची गुण पत्रिकेची प्रत साक्षांकित असलेली जोडणे :

२] ज्या कॉलेजामध्ये प्रवेश घेतला त्या कॉलेजच्या मुख्याध्यापकाकडून घेतलेला दाखला जोडावा. :

अर्जदाराची सही ..२..

मी, श्री./श्रीमती ———————————————— हुद्दा ——————————
अर्जदाराचे/ची आई/वडील असून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ——————————————
———————————— येथे काम करीत असलेल्या /ली असे नमूद करितो/
ते की, वरील दिलेली माहिती सत्य आहे.

कर्मचा-याची सही.

सादर अग्रेषित :

असे प्रमाणित करण्यात येते की, माझ्या माहितीनुसार वर दिलेली माहिती पडताळून पाहण्यात आली असून ती बरोबर आहे.

नियंत्रण अधिका-याची सही

..शिक्का.

## प्र प त्र "ड"

मुख्य कार्यालयीन परिपत्रक क्र. [illegible]आयआर/ब/एस डब्ल्यू. फंड १४९२ दि. १२-१-८३ नुसार मंडळाच्या माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या गुणवत्ता यादीत पहिल्या ५० क्रमांक पर्यंत आलेल्या विद्यार्थ्यांना/ विद्यार्थीनिंना विशेष रोख बक्षिस रु.५००/- मिळण्यासाठी करावयाचा अर्ज.

१] अर्जदाराचे नांव :

२] अर्जदाराच्या आई/वडीलांचे नांव व हुद्दा :

३] अर्जदाराच्या आई/वडीलांच्या कामाचे ठिकाण :

संभाग :

प्रविभाग :

परिमंडळ :

४] वेतनगट :

५] माध्यमिक शालांत, उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा पास झाल्याची तारीख :

६] माध्यमिक शालांत उच्चमाध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेला बसलेल्या केंद्र व शाळेचे नांव :

७] माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा मंडळाचे नांव व पहिल्या ५० विद्यार्थ्यात मिळविलेला गुणवत्ता नंबर [परीक्षा मंडळाकडून किंवा मुख्याध्यापक, शाळा यांजकडून मिळालेल्या गुणवत्ता नंबर निर्देशित केलेला दाखला जोडावा] :

८] एकंदर मिळविलेले गुण व त्याची टक्केवारी :

सोबत: माध्यमिक शालांत उच्चमाध्यमिक शालांत प्रमाणपत्र पास झाल्याचा दाखला व गुणपत्रीकायांची एकेक प्रत सांक्षणित केलेली व गुणवत्ता नंबर

अर्जदाराची सही/-

मी, श्री. /श्रीमती---------------------------- हुद्दा ----------- ------------------------- अर्जदाराचे/ची आई/वडील असून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ------------------------------------------ येथे काम करीत असलेल्या/ली असे नमूद करीतो/ते की, वरील दिलेली माहिती सत्य आहे.

कर्मचा-याची सही.

सादर अग्रेषित:

असे प्रमाणित करण्यांत येते की, माझ्या माहितीनुसार वर दिलेली माहिती पडताळून पाहण्यात आली असून ती बरोबर आहे.

नियंत्रण अधिका-याची सही
शिक्का.